वाचून - १ शासन निर्णय क्र एपिटी, १०००/प्रक्र२७२/१३ दि ०६ जून २००१
२ ग वि अ, पं स पाटण यांचे कडील पत्र क्र पंसपा/आस्था२/ काथि/१०९६/१८ दिनांक
२४.०९.२०१८ प्राप्त दिनांक ०३/१०/२०१८
३ इकडील पत्र क्र ग्रापं३/काथि/११०८/१/१८ दि १९/११/२०१८
४ इकडील पत्र क्र ग्रापं३/काथि/११०८/२/१८ दि १९/११/२०१८
५ दैनिक तरुण भारत,सातारा दिनांक ०४/१२/२०१८
६ पोलिस निरिक्षक,करवीर/राजापूर पोलिस स्टेशन, कोल्हापूर यांचेकडील अहवाल दिनांक
२७.११.२०१८, ०७/१२/२०१८
७ या कार्यालयाकडील मंजूर टिपणी

क्र ग्रापं/काथि-३/१५०२३/२०१९
ग्रामपंचायत विभाग
दिनांक /०१/२०१९
१४/०२/२०१९

## आ दे श

ज्या अर्थी श्री रविंद्र आण्णा कांबळे, कंत्राटी ग्रामसेवक, पंचायत समिती, पाटण ता.पाटण जि सातारा हे दिनांक २०/०७/२०१२ पासून आज अखेर पंचायत समिती, पाटण येथे अनाधिकृत गैरहजर आहेत. त्याबाबत त्यांना दिनांक २०/०७/२०१२ पासून ... गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण यांचेमार्फत दिनांक २९/०८/२०१२ व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं) जि प सातारा यांचेयमार्फत दिनांक ३१/०१/२०१३ रोजी नोटीस देण्यात आलेली होती. सदरच्या नोटीसा त्यांचे नियुक्ती आदेशावरील पत्यावर पाठवूनही मालक भेटत नाही असे शेरे मारुन नोटीसा परत आलेल्या आहेत. सदर नोटीसा बजाविणेकामी त्यांनी कार्यालयास दिलेल्या पत्यावर/दुरध्वीवर तसेच हस्तेपरहस्ते मिळालेल्या पत्यावर व दुरध्वणीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता श्री कांबळे यांचेशी संपर्क होऊ शकला नाही. तसेच श्री कांबळे यांची सेवा कंत्राटी असल्याने त्यांची सेवा संपुष्टात आणणे विषयी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण यांनी शिफारस केलेली आहे. अनाधिकृत गैरहजेरीच्या कालावधीमध्ये श्री कांबळे यांनी कार्यालयाशी संपर्क साधला नाही. तसेच त्यांना कामावर हजर होणेसाठी शेवटची संधी म्हणून पोलिस यंत्रणेमार्फत/दैनिक वृत्तपत्रामधून अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती, परंतु सदर नोटीसी नुसार श्री कांबळे यांनी या कार्यालयाशी संपर्क साधून त्यांचा खुलासा विहीत वेळेत/आज अखेर सादर केलेला नाही.

ज्या अर्थी श्री कांबळे हे कंत्राटी ग्रामसेवक असुन कंत्राटी ग्रामसेवकांना नियुक्ती देणेकामी अटी व शर्ती शासन निर्णय क्र.एपिटी / १००० / प्र.क्र.२७२ /१३ दिनांक ६ जून २००१ मध्ये नमुद केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील जोडपत्र अ मधील अ.क्र.१६ (४) मध्ये नियुक्तीच्या कालावधी मध्ये उमेदवाराने कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक केल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करणेत येईल असे स्पष्ट केले आहे.

त्या अर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा या आदेशाव्दारे श्री रविंद्र आण्णा कांबळे कंत्राटी ग्रामसेवक, पंचायत समिती, पाटण ता.पाटण जि सातारा यांची दिनांक २०/०७/२०१२ पासुन सातारा जिल्हा परिषदे कडील कंत्राटी ग्रामसेवक सेवा या आदेशाव्दारे समाप्त करीत आहे.

सदरचे आदेशाची नोंद श्री कांबळे, कं.ग्रा.से. यांचे सेवापुस्तकात घेणेत यावी.

(डॉ. कैलास शिंदे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रति,

श्री रविंद्र आण्णा कांबळे, कंत्राटी ग्रामसेवक, पंचायत समिती, पाटण ता.पाटण जि सातारा
(गट विकास अधिकारी, पं स पाटण यांचे मार्फत)

प्रत- गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, पाटण यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
२/सोबत आदेशाच्या तीन प्रती पाठविणेत आल्या असून सदरचे आदेशाची प्रत श्री कांबळे कं.ग्रा.से. यांना बजावून त्यांची दिनांकित पोहोच घेतलेली प्रत या कार्यालयास पाठविणेत यावी.
प्रत-मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि प सातारा यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्रत- आस्थापना २(१)/ग्रा पं २(२) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner